# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Children in distress situation**

**Police Station** :- **WashimPolice**

**Date of Good Work done** :- **16/06/2020**

**Brief of the work done :-**

वाशीम पोलीस - संगीताताईच्या रूपाने खाकी वर्दीतून पाझरतोय माणुसकीचा झरा दि १६/०६/२०२०



पान २ — वाशीम Express — मंगळवार १६ जून २०२० — सिटी न्यूज सुपरफास्ट

## संगीताताईच्या रूपाने खाकी वर्दीतून पाझरतोय माणुसकीचा झरा

**'त्या'** आदल्या दिवशीच निश्चय करतात की, उद्या किती लोकांना जेवण द्यायचे आहे. मग सकाळी चार वाजताच त्यांचा दिनक्रम सुरू होतो. भल्या पहाटे उठणे, तयारी करणे, आणि स्वतः भाजी-पोळी बनविणे, तयारी झाल्यानंतर एका डब्यात भरणे , आणि आपल्या स्कुटीवर डबा घेऊन जाणे. तेथे गेल्यावर एकाएकाला अन्नाचे वाटप करणे.आणि लगेचच तेथून परतून ड्युटीवर हजर होणे.

पुन्हा दुसऱ्या दिवशीही हाच दिनक्रम. 'त्यांच्या' या उपक्रमाला आता दोन-चार दिवस नव्हे तर दोन महिने पूर्ण झाले आहेत. हा सगळा घटनाक्रम अशक्यप्राय वाटत असला तरी सत्यच आहे. खाकी वर्दी च्या माध्यमातून पोलीस सेवेत कार्यरत असलेल्या एका युवतीने आपल्या कृतीतून खाकी वर्दीतील माणूसपणाचा झरा खळखळता असल्याचे सिद्ध केले आहे. संगीत मारोती ढोले असे त्या पोलीस भगिनीचे नाव. 'लॉकडाऊनमधील हिरो' या सदराच्या माध्यमातून आम्ही लॉकडाऊन दरम्यान जनसेवा करणाऱ्या अनेक व्यक्ती, ग्रुप , संस्थांचे कार्य समाजापुढे मांडत आहोत. मात्र, आजच्या भागातील पोलीस विभागात कार्यरत असणा?या या भगिनीचे गेल्या दोन महिन्यातील अन्नदानाचे कार्य एवढे दैदिप्यमान असेल असे आम्हाला सुद्धा वाटत नव्हते. त्यांची मुलाखत घेताना ज्याप्रकारे त्या आपले अन्नदानातील कार्यांचे प्रसंग कथन करत होत्या. तेव्हा विचार पडत होता की, आपल्या शब्दसाठ्यात त्यांच्या या सगळ्या भावना कशा शब्दबद्ध करणार ! कारण, त्यांच्या कार्याची महती विशद करताना शब्द अपुरे पडणार ! याची आम्हाला तेव्हाच कल्पना आली होती . अन , झालेही तसेच ! भुकेल्यांची अन्नाची भूक शमविण्यासाठी एक युवती आपली नोकरी करून जीवाचा किती आटापिटा करते. हे आम्ही संगीताताईंच्या रुपाने न्याहाळत होतो.

चार मुले असणाऱ्या आई-वडिलांना जेव्हा पाल ठोकून जेवणाची भीक मागावी लागते. आणि त्यांना दररोज 'तिच्या' हातून, मायेचा घास भरविला जातो. आणि 'तूच आमची लेक' असे शब्द कानी पडतात. तेव्हा तिच्या या धावपळीचे मोल काय असेल. सर्वकाही शब्दांच्या पलीकडचे आहे. म्हणूनच आम्हास ही स्टोरी 'लिमिटेड' शब्दात शब्दबद्ध होणारच नाही. तरीसुद्धा सदराचे वैशिष्ट्य कायम ठेवण्यासाठी संगीताताईंचा दोन महिन्यापासूनचा दिनक्रम आपल्या पुढ्यात ठेवत आहे.

वाशिम तालुक्यातील तोंडगाव या गावातील रोजमजुरी करून आपल्या संसाराचा गाडा चालविणारे मारोती ढोले हे सद्गृहस्थ. स्वतः शिक्षित नसले तरी शिक्षणाचे महत्त्व जाणलेल्या मारोती ढोले यांनी आपल्या मुलांना शिकविण्याचा ध्यास घेतला. अनेक जण आपल्या मुलाला शासकीय नोकरीत पाहण्यास उत्सुक असतात. मात्र , मुलगाच नव्हे तर , मुलीलाही शासकीय सेवेत आणि त्यातल्या त्यात पोलीस वर्दीत पाहण्याचे त्यांचे स्वप्न होते. मारोतीरावांची धाकटी मुलगी संगीता ही बालपणापासूनच हुशार होती. त्यामुळे तिला त्यांनी उच्चशिक्षणासाठी वाशीमला पाठविले. पुढे संगीताने एम एस डब्ल्यू करून वकिलीच्या शिक्षणासाठी प्रवेश घेतला. अशातच पोलीस भरती निघाली आणि वडिलांचे स्वप्न आणि आलेल्या संधीचे सोने करून संगीता २००७ मध्ये पोलीस भरतीत पात्र ठरली. पुढे पोलीस भरतीचे प्रशिक्षण झाल्यानंतर वाशीम येथील जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात महिला तक्रार निवारण कक्षात रुजू झाली. आपले कर्तव्य चोखपणे पार पाडणे आणि अडचणीत असणाऱ्यांना जमेल तशी मदत करण्याचा संगीताचा स्वभाव असल्याने त्यांना महिला तक्रार निवारण कक्षात उत्तमप्रकारे कर्तव्य पार पाडता आले. कर्तव्य बजावताना त्यांना महिला तक्रार निवारण कक्षात आलेल्या अनेक महिलांचे योग्य समुपदेशन करून संसार जोडण्याचे काम करता आले. तब्बल बारा वर्षे त्या ठिकाणी कर्तव्य बजावल्यानंतर त्यांची गतवर्षी वाशिम शहर पोलीस स्टेशनमध्ये बदली करण्यात आली. याठिकाणी त्यांची जनरल ड्युटी असल्याने त्यांना ठिकठिकाणी ड्यूटीवर जावे लागत होते. वाशीमच्या सिव्हील लाईन भागातील पोलिस वसाहतीत त्यांचे सध्या वास्तव्य आहे.

मार्चमध्ये कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊन असल्याने इतर पोलीस बांधवांप्रमाणेच त्यांनाही वाशीम शहरात ड्यूटीवर जावे लागत होते. अशातच मार्चच्या शेवटी एके दिवशी त्यांची ड्युटी माहूरवेश भागात लागली. ड्युटीवर कार्यरत असताना काही सामाजिक कार्यकर्त्यांनी गोरगरिबांना देण्यासाठी जेवण आणले होते. यावेळी ड्युटीवर असल्यामुळे त्यांनाही जेवणाचे ताट मिळाले. मात्र, एवढ्यातच एक महिला त्यांच्याजवळ आली आणि जेवण देण्याची मागणी केली. संगीताताईने लगेच हातातील ताट त्या महिलेला दिले. आणि आल्यानंतर महिलेची विचारपूस केली. त्यानंतर त्या महिलेला पुढे तहसीलच्या माध्यमातून कायमस्वरूपी अन्नधान्य मिळण्याचा मार्ग खुला केला. या घटनेने भुकेल्यांप्रती त्यांच्या भावना अनावर झाल्या. आणि भुकेल्यांना अन्न देण्याचा विडाच जणू त्यांनी उचलला. मग पुढे ड्युटीवर जाताना त्या आपल्या गाडीच्या डिकीत चिवडा , बिस्किटांचे पॅकिट ठेवणे , भुकेला दिसला की त्याला लगेच देणे , कुणाला परिस्थिती पाहून शे-दोनशे रुपये देणे असे मदत कार्य त्या करत राहिल्या. काही कायम स्मरणात राहणाऱ्या घटनांचा त्यांनी आमच्याशी उलगडा केला. यातील काही घटना येथे मांडत आहोत.

लाखाळ्यावर तामसीची एक आजीबाई त्यांना भेटली. आणि माझी मुले जेवू घालत नाहीत म्हणून रडत होती. तिला संगीताताईने अन्नधान्य देऊन घरी पोहोचविले. एक वेळ त्या पुसद नाक्यावर ड्युटीवर असताना हिंगोलीवरून मध्यप्रदेश कडे जाणारे एक पायदळ चालून थकलेले आणि भुकेने व्याकूळ झालेले मुलाबाळांसह असलेले कुटुंब त्यांना दिसले. यावेळी त्यांनी चौकशी करून त्यांना खाण्यापिण्याची सोय केली. शेलू फाट्यावर एका पायदळ जाणा?या गर्भवतीला जेवण दिले. ड्युटीवर असताना अशा अनेक घटना त्यांना दिसत होत्या. १४ एप्रिल रोजी त्यांनी एक क्विंटल गहू शहरातील ग्रामीण पोलीस स्टेशन आणि रेल्वेस्टेशन परिसरात पालात राहणा?या गोरगरिबांना वाटला. आता मात्र त्यांनी जेवणच बनवून वाटण्याचा संकल्प केला. आणि २६ एप्रिल पासून तो अमलात आणला. दररोज ड्युटीचा टाइमिंग पाहून चार वाजताच उठणे, आज किती लोकांना जेवण द्यायचे हे ठरविणे, आणि त्या प्रमाणात भाजी पोळ्या बनविणे, आणि एका मोठ्या डब्यात भरणे, आणि आपल्या स्कुटीवर तो डबा घेऊन तो परिसर गाठणे आणि आपली आतुरतेने वाट पाहणाऱ्या त्या गोरगरिबांना , चिल्यापिल्यांना वाटणे. तेथुन लगेच घरी येऊन डब्बा ठेऊन आणि वर्दी अंगावर चढवून वेळेत डयुटीवर रुजू होणे. पुन्हा दुसऱ्या दिवशी तोच दिनक्रम !एखाद्या दिवशी ड्युटी सकाळीच असली तर, सात आठ किलो तांदळाची खिचडी तयार करणे, डब्यात भरणे आणि स्कूटीवर नेऊन वितरित करणे. असा त्यांचा आता दिनक्रमच बनला आहे. शहरातील ग्रामीण पोलीस स्टेशन समोर राहणारे लोक, रेल्वेस्टेशन परिसरात राहणारे, वाटाणेवाडी परिसरातील लोक, शेलुबाजार रोडवरील पालात राहणारे लोक , अशांना संगीताताईंचा जेवणाचा घास दररोज न चुकता पोहोचत आहे. त्यांच्या या उपक्रमाला आता दोन महिने पूर्ण होत आहेत. एका दिवशी ३० ते ४० लोकांना स्वतः बनवलेले जेवण स्वतःच वितरित करण्याच्या त्यांच्या या मिशनला 'वन मॅन आर्मी ' असेच म्हणता येईल. 'एकच ध्यास आणि गोरगरिबांना घास' असा संकल्प केलेल्या या युवती चे कौतुक कोणत्या शब्दात करावे सुचत नाही. त्यांच्या या समाजसेवेच्या कार्याला बंगाले नामक सेवानिवृत्त पोलिस अधिकाऱ्याकडून प्रेरणा मिळते. सोबतच आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडूनही प्रोत्साहन मिळत आहे. एकीकडे पोलीस बांधवांवर अनेक वेळा आरोप प्रत्यारोप होतांना आपण पाहत असतो. मात्र, पोलीस बांधवही सामाजिक जाणीवेने ओतप्रोत असतात. याचा आदर्श पाठच संगीताताईंच्या कृतिशीलतेने घालून दिला आहे. संगीताताई खेळातही निपुण आहेत. त्या स्वतः योगा करत असून लॉकडाऊन दरम्यान आपल्या घरी काहींना योगा शिकवितात. काकडदाती या गावात त्यांनी योगाचे कूासेसही घेतलेत. वेटलिफ्टींगचेही मोफत ट्रेनिंग त्या देतात. आपली नोकरी आणि अन्नदानाच्या या कार्यातून वेळ काढून त्या एमपीएससीची तयारी ही करीत आहेत. अधिकारी होऊन जनसेवेला समर्पित करत निराश्रीतांसाठी आधार केंद्र चालविण्याचा त्यांचा मानस आहे. म्हणूनच आपल्याला समजून घेणारा , सामाजिक जाणीवेचा जोडीदार त्यांना हवा आहे. एका युवतीची जिद्द, मदतीची तळमळ, आणि करीत असलेले कार्य आमच्याच नाही तर समाजाच्या दृष्टीनेही आमच्या 'लॉकडाऊनमधील हिरो' च्या व्याख्येच्या पलीकडे असणारे ठरले आहे. त्यामुळे आम्ही संगीताताई ढोले यांना 'दै. सिटीन्यूज सुपरफास्ट' च्या वतीने आधी सॅल्युट करतो आणि मानाचा मुजराही करतो !

लॉकडाऊन मधील हिरो

* संगीता ढोले *

गजानन धामणे
मुक्त पत्रकार
मो.९८८१२०४५३८